महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय

महात्मा ज्योतिबा फुले
संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर

वसंतराव नाईक
संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

जा.क्र/म/व/स्पर्धा-परीक्षा/१८३९/२०२६-२७ दि:-१३/१०/२०२६

# परिपत्रक

**विषय :- सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थांची निवड करण्यासाठी घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांची उत्तरपत्रिका व आक्षेप फलकाची लिंक.**

महाज्योती व वनार्टी संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा/अभियांत्रिकी सेवा/संयुक्त गट ब व क) तसेच लष्करातील सैनिक भरती परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थांची निवड करण्यासाठी चाळणी परीक्षा दि.०७/१०/२०२६ ते दि.११/१०/२०२६ रोजी घेण्यात आलेली होती.

त्यानुसार सदर चाळणी परीक्षांची उत्तरपत्रिका महाज्योती व वनार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून विद्यार्थांना सदर चाळणी परीक्षांच्या उत्तरपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नांवर आक्षेप असल्यास त्याबाबतचे आक्षेप नोंदविण्याकरिता आक्षेप फलकाची लिंक सदर परीपत्राकासोबत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

आक्षेप नोंदविण्याकरिता सूचना सदर परिपत्रकासोबत प्रसिद्ध करण्यात येत आहे, तसेच आक्षेप नोंदविण्याचा कालावधी दि.१४/१०/२०२६ रोजी सांयकाळी ०६:०० वाजता पर्यत राहील, सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती), नागपूर**

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(वनार्टी), नागपूर**